महाराष्ट्राचा मानबिंदू
लोकमत
पृष्ठे : १२+४+४ (सखी) = २०, किंमत : ₹ ५.००
सातारा, मंगळवार, दि. १७ डिसेंबर २०१९

D. P. BHOSALE Library KOREG

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव

# शहीद जवानांच्या त्यागाची जाणीव ठेवावी

## काशीद : डी. पी. भोसले महाविद्यालयात विजय दिन उत्साहात साजरा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोरेगाव :** 'भारत आणि पाकिस्तान यांच्यात झालेल्या युद्धामध्ये भारताने पाकिस्तान सैन्यावर विजय मिळविला. त्र्याणव हजार पाकिस्तानी सैनिकांनी भारतीय सेनेला आत्मसमर्पण केले तो दिवस म्हणजे विजय दिवस म्हणून देशभर साजरा केला जातो. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी शहीद जवानांच्या त्यागाची व कर्तृत्वाच्या इतिहासाची जाणीव ठेवावी,' असे प्रतिपादन २२ महाराष्ट्र बटालियन एनसीसी सातारा विभागाचे कमांडिंग ऑफिसर कर्नल बी. एस. काशीद यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या डी. पी. भोसले महाविद्यालयात जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सातारा, २२ महाराष्ट्र बटालियन, एनसीसी, एक्स डीपीएन्स असोसिएशन, विजय दिन समारोह समिती व सोनेरी ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या विजय दिन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सातारा जिल्हा सैनिक कल्याण विभागाचे अधिकारी कमांडर विजयकुमार पाटील उपस्थित होते.

कमांडर विजयकुमार पाटील म्हणाले, 'पास होऊन पदवी घेण्यापेक्षा त्या विषयाचे ज्ञान परिपूर्ण असायला हवे. स्पर्धा परीक्षेच्या अनुषंगाने विविध कौशल्ये आत्मसात करून घ्यावीत.



कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयात जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सातारा यांच्यावतीने विजयदिनी शहिद जवानांच्या कुटुंबांचा सत्कार केला.

विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून अलिप्त राहिले पाहिजे. समाजात आपली एक चांगली प्रतिमा तयार झाली पाहिजे. जीवनात होकारात्मक दृष्टिकोन व तत्त्व महत्त्वाचे असते. वेगवेगळ्या भाषांच्या ज्ञानामुळेही नोकरीच्या संधी मिळू शकतात. त्यावरच यशाचे भवितव्य अवलंबून असते.'

कार्यक्रमाचे रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी प्रास्ताविक केले. शिवगंगा कदम, द्रौपदी मतकर, मिराबाई बोबडे व मथुरा चव्हाण आदी शहीद जवानांच्या कुटुंबीयांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यानिमित्ताने चॅलेंज ॲकॅडमीच्या व सरस्वती इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी ॲरोबिक प्रात्याक्षिक सादर केले. डी. पी. भोसले महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तायक्वाँदोची प्रात्याक्षिके सादर केली.

विजय दिनाच्या कार्यक्रमास कर्नल विष्णुपंत चव्हाण, दिलीप वेलियावेट्टील, लेफ्टनंट प्राचार्य रुथा जोशी, एक्स. डीपीएन्स असोसिएशनचे सचिव विजयकुमार घारगे, खजिनदार दीपक देवरे, कोरेगाव तालुका आजी माजी संघटनेचे अध्यक्ष अनंत शिंदे, प्रभाकर बर्गे, सी. आर. बर्गे, अशोक नलावडे, उपप्राचार्य डॉ. एस. डी. जाधव, उपप्राचार्य डॉ. विजय वाडते, प्रा. चंद्रकांत जावळे, एनसीसी विभागाचे लेफ्टनंट बाळकृष्ण भोसले, शहीद जवानांचे कुटुंबीय, नागरिक, विद्यार्थी-विद्यार्थिनी, महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर सेवक उपस्थित होते. संगीता वीरकर, देवकी भोसले यांनी सूत्रसंचालन केले. अनंत शिंदे यांनी आभार मानले.